International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor – 7.328
Vol.8 No.6 July – Aug 2021

# महाराष्ट्राच्या विकासातील यशवंतराव चव्हाण यांचे योगदान

**प्रा. मारुती चांगदेव हजारे**
संतोष भीमराव पाटील आर्ट्स, कॉमर्स
आणि सायन्स महाविद्यालय, मंद्रूप

**सारांश:**

महाराष्ट्राच्या विकासामध्ये मा. यशवंतराव चव्हाण यांचे योगदान मोठे आहे. नवमहाराष्ट्राच्या निर्मितीनंतर महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्राच्या विकासासाठी कृषी-औद्योगिक प्रतिमान राबविले. हे प्रतिमान संपूर्ण देशभर आदर्श ठरले. या प्रतिमानाच्या आधारे काँग्रेस पक्षाने समाजातील विविध घटकांचा पाठिंबा मिळविला. यामुळे अल्पावधीतच महाराष्ट्र हे भारतातील एक पुढारलेले राज्य म्हणून पुढे आले. या काळात महाराष्ट्राचा शेती, सहकार, शिक्षण व उद्योग या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात विकास झाला. काँग्रेस पक्षाचे विविध सामाजिक, आर्थिक, संस्थात्मक, प्रादेशिक आधार निर्माण झाले. १९६० ते १९९० या कालखंडामध्ये महाराष्ट्रामध्ये काँग्रेस वर्चस्वाची एक खास चौकट निर्माण झाली. १९९० नंतर विविध कारणामुळे यशवंतराव चव्हाण प्रतिमानाच्या मर्यादा स्पष्ट झाल्या. काँग्रेस पक्षासमोर अनेक नवी आव्हाने निर्माण झाल्यामुळे महाराष्ट्राची अधोगती व्हावयास सुरुवात झाली.

**सूचक शब्द :** नवमहाराष्ट्र, कृषी-औद्योगिक प्रतिमान, कल्याणकारी योजना, काँग्रेस वर्चस्व, मराठा वर्चस्व, काँग्रेस पक्षाचा ऱ्हास इ.

**प्रस्तावना:**

१ मे १९६० रोजी नवमहाराष्ट्र निर्माण झाला. महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर काँग्रेस पक्ष हा महाराष्ट्रातील राजकारणाच्या पटलावरचा एक प्रमुख पक्ष बनला. महाराष्ट्राच्या राजकारणात काँग्रेस पक्षाचे स्थान अतिशय वैशिष्ट्यपूर्ण बनले. काँग्रेस पक्षाचे राजकीय नेतृत्व व विचारसरणी आणि महाराष्ट्राच्या विकासासाठी राबविलेल्या विविध कल्याणकारी योजना यामुळे महाराष्ट्रामध्ये काँग्रेस वर्चस्वाची एक वैशिष्ट्यपूर्ण चौकट निर्माण झालेली दिसून येते. काँग्रेस वर्चस्वाच्या विशिष्ट चौकटीमुळे महाराष्ट्रामध्ये काँग्रेस पक्षाचा प्रभाव दीर्घकाळ टिकून राहिला. यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्राच्या विकासाचे प्रतिमान मांडले. हे प्रतिमान काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून राबविण्याचा प्रयत्न केला. यशवंतराव चव्हाण यांनी राबविलेले महाराष्ट्राच्या विकासाचे कृषी-औद्योगिक प्रतिमान संपूर्ण देशभर आदर्श ठरले. या प्रतिमानाच्या आधारे काँग्रेस पक्षाने समाजातील विविध घटकांचा पाठिंबा मिळविला. यातून महाराष्ट्रामध्ये काँग्रेस पक्षाचे विविध सामाजिक, आर्थिक, संस्थात्मक, प्रादेशिक आधार निर्माण झाले. याचा परिणाम म्हणून स्थानिक स्वराज्य संस्था, विधानसभा, विधानपरिषद व लोकसभा या निवडणुकांत काँग्रेस पक्षाला मतदानाची टक्केवारी व जागांची संख्या मोठ्या प्रमाणात मिळत राहिली. या कालखंडात महाराष्ट्रातील शेती, सहकार, शिक्षण व उद्योग क्षेत्राची मोठ्या प्रमाणात प्रगती झाली. यातून महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागाचा विकास मोठ्या प्रमाणात झाला. महाराष्ट्राची एक प्रकारे संस्थात्मक बांधणी या काळात झाली.

**शेती क्षेत्राचा विकास:**

यशवंतराव चव्हाण यांनी शेती क्षेत्रात जमीन सुधारणा कायदे, विविध पाटबंधारे योजना राबविल्या. पडीक जमिनी लागवडीखाली आणण्याच्या दृष्टीकोनातून शासकीय पातळीवर प्रयत्न केले. वाजवीपेक्षा अधिक जमिनी असणाऱ्या लोकांकडील जमिनी भूमिहीनांना वाटप करण्यासाठी महाराष्ट्र राज्य कुळकायदा केला. शेतीच्या आधुनिकीकरणाच्या मार्गातील अडथळे दूर करण्याचा प्रयत्न केला. शेती व्यापारी तत्त्वाने केली पाहिजे. शेतकऱ्यांनी कृषीशास्त्राचा अभ्यास केला पाहिजे, असे यशवंतराव चव्हाण यांचे मत होते. नद्यांच्या पाण्याचा शेतीसाठी वापर करण्यासाठी मोठ्या प्रमाणात नद्यांवर धरणे बांधली. जलसिंचनासाठी विजेची गरज ओळखून वीजनिर्मिती प्रकल्पांना चालना दिली. त्यासाठी महाराष्ट्र राज्य वीजनिर्मिती महामंडळाची स्थापना करण्यात आली. कृषीबरोबरच कृषी आधारित उद्योग व इतर उदयोगांचा विकास करण्यासाठी त्यांनी मोठ्या प्रमाणात प्रयत्न केले.

**उद्योगधंद्यांचा विकास:**

शेतीबरोबरच महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी उद्योगधंद्यांची गरज ओळखून यशवंतराव चव्हाण यांनी राज्यभर औद्योगिक वसाहती स्थापन करण्याची सर्वंकष योजना आखली. ज्यायोगे शहरांपासून दूर ग्रामीण भागात देखील छोटे कारखाने निघून तेथे रोजगार वाढला. औद्योगिक वसाहती स्थापन करण्याची मूळ कल्पना पंडित नेहरुंनी १९४७ मध्ये स्थापन केलेल्या ॲडव्हायजरी प्लानिंग बोर्डाची होती. त्यांनी १९५५ मध्ये प्रांतांना औद्योगिक वसाहती स्थापन करण्याची शिफारस केली. तेव्हा मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांचे द्वैभाषिक महाराष्ट्र राज्य आघाडीवर होते. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र राज्य झाल्यावर त्या योजनेत सुधारणा करुन तिचा वेगाने विस्तार केला. मुंबईजवळ ठाणे, पुण्याच्या

आसपास आणि कोल्हापूरजवळ शासकीय प्रयत्नाने अशा वसाहती निर्माण केल्याचे दिसून येते. महाराष्ट्रामध्ये उद्योगधंद्यांची शीघ्र व सुव्यवस्थित स्थापना व्हावी तसेच वाढ व्हावी, या हेतूने महाराष्ट्र सरकारच्या माध्यमातून त्यांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ नुसार १ ऑगस्ट १९६२ रोजी महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाची (एम् आय डी सी) निर्मिती केली. या योजनेप्रमाणे उद्योगांना पुष्कळ सोयी-सवलती मिळाल्या. पुण्याजवळ भोसरी इथे औद्योगिक वसाहत उभारायची होती तेव्हा यशवंतराव चव्हाण यांनी स्वत: जाऊन वसाहतीसाठी जागा निवडली. यशवंतराव चव्हाण हे समतोल विकासाचे पुरस्कर्ते होते. म्हणून औद्योगिक क्षेत्रात विकास योजना आखताना अविकसित विभागांचा त्यांनी आधी विचार केला. ग्रामीण भागात औद्योगिकीकरण करण्यासाठी त्यांनी ग्रामीण भागात उद्योग सुरू करून शेती आणि उद्योगांची सांगड घातली. शहरी व ग्रामीण अर्थव्यवस्थेची सांगड घालून शहरांकडे धाव घेणारा श्रमिकांचा लोंढा थोपविला. औद्योगिक विकासासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण नियोजन केले. देशाचा संतुलित आर्थिक विकास व्हावा यासाठी त्यांनी महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाचा मास्टर प्लान तयार केला.

**सहकार चळवळीचा विकास:**

शेती व उद्योगधंद्यांच्या जोडीने सहकार चळवळ उभी करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. भारतासारख्या कृषिप्रधान देशाच्या विकासासाठी यशवंतराव चव्हाण यांची सहकारी तत्त्वे फार उपयुक्त ठरतात. त्यांच्या प्रयत्नातून महाराष्ट्रात सहकाराची खूप मोठी परंपरा निर्माण झाली. आजही सहकाराच्या राजकारणासाठी महाराष्ट्र ओळखला जातो. सहकारी साखर कारखाने, सहकारी सूतगिरण्या, सहकारी दुध संघ, कुक्कुटपालन, सहकारी पतपेढ्या महाराष्ट्रात सुरु करण्यास त्यांनी प्रोत्साहन दिले. सहकारी चळवळीच्या माध्यमातून महाराष्ट्रातील गावोगावी सहकारी बँका, जिल्हा मध्यवर्ती बँका, खरेदी-विक्री संघ व विविध सेवा सहकारी सोसायट्या यांचे प्रचंड मोठे जाळे निर्माण केले. यासाठी सहकारी कायदे तयार केले. सहकारातून नव्या प्रकारचे नेतृत्व महाराष्ट्राच्या राजकारणात तयार झाले. या नेतृत्वास पुढे राज्याच्या राजकारणात नेतृत्व करण्याची संधी मिळाली. यशवंतराव चव्हाण यांचे सहकारी अर्थकारण ही विकासाच्या अर्थशास्त्राला मिळालेली एकमेवाद्वितीय देणगीच आहे. सहकारी चळवळीच्या माध्यमातूनच यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्राचा खूप मोठ्या प्रमाणात विकास केला. 'सहकारी चळवळ म्हणजे महाराष्ट्र, सहकारी चळवळ म्हणजे यशवंतराव चव्हाण' असे समीकरण देशात तयार झाले होते.

**शिक्षण क्षेत्राचा विकास:**

यशवंतराव चव्हाण यांनी राज्याचे मुख्यमंत्री म्हणून महाराष्ट्राच्या शिक्षण क्षेत्रामध्ये दूरगामी परिणाम करणारे निर्णय घेतले. शिक्षणक्षेत्रातील सर्वात महत्वाचा निर्णय म्हणजे नवी विद्यापीठे व शिक्षणसंस्था स्थापन करायचा निर्णय. त्या काळात महाराष्ट्रात मुंबई-पुण्यासारखी मोजकी विद्यापीठे होती. त्यामुळे शिक्षण सर्वदूर नेण्यासाठी औरंगाबाद व कोल्हापूर येथे नवीन विद्यापीठे स्थापन केली. तसेच त्यांनी तालुका व जिल्हा पातळीवर कला, शास्त्र, वाणिज्य व इंजिनिअरींगची महाविद्यालये सुरु केली. या विद्यापीठे व महाविद्यालयांतून आधुनिक पद्धतीचे शिक्षण घेतलेली एक नवी पिढी महाराष्ट्रात तयार झाली. यशवंतराव चव्हाण यांनी आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्यांना शैक्षणिक शुल्कात सवलत (EBC) सुरु केली. त्यामुळे अनेकजण शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आले. शिक्षणाच्या माध्यमाबाबत क्रांतिकारी निर्णय घेतला. प्राथमिक शिक्षण, माध्यमिक शिक्षण व उच्च शिक्षणाच्या सर्वांगिण विकासासाठी त्यांनी प्रयत्न केले. महाराष्ट्राचा खऱ्या अर्थाने विकास साधायचा असेल तर आपण ज्ञान, विज्ञान आणि तंत्रज्ञानाची कास धरली पाहिजे असे त्यांचे मत होते. यशवंतराव चव्हाण यांनी शैक्षणिक क्षेत्रात घेतलेल्या निर्णयांमुळे महाराष्ट्राच्या शिक्षणक्षेत्रात अनेक क्रांतिकारी बदल झाले.

**स्थानिक स्वराज्य संस्थाचा विकास:**

महाराष्ट्राचा संस्थात्मक विकास व्हावा यासाठी यशवंतराव चव्हाण यांनी पंचायतराज संस्थांचा विकास केला. त्यासाठी बलवंतराय मेहता समिती व प्राचार्य पी. बी. पाटील समितीच्या शिफारशीनुसार महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थेचा कायदा केला. काँग्रेस पक्षामध्ये नव्याने प्रवेश केलेल्या नेतृत्वास जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका व महानगरपालिकांवर संधी देऊन काँग्रेस पक्षामध्ये नेतृत्वाची एक मजबूत फळी निर्माण केली. त्यांनी महाराष्ट्रातील काँग्रेस वर्चस्वास पंचायत राज्य संस्थावरील वर्चस्वाची जोड दिली. त्यांनी या सर्व संस्थांवर काँग्रेस पक्षातील मराठा अभिजनांचे वर्चस्व निर्माण केले.

**सामाजिक न्यायाची भूमिका:**

यशवंतराव चव्हाण यांनी सामाजिक न्यायाच्या भूमिकेतून राज्यकारभार चालविला. त्यांनी महाराष्ट्रात बेरजेचे राजकारण उभे केले. यासाठी त्यांनी 'बहुजनवाद' या विचारावर आधारित काँग्रेस पक्षाच्या सत्ताकारणाची चौकट तयार केली. त्यामुळे काँग्रेस पक्षास विविध सामाजिक घटकांकडून वैचारिक व सांस्कृतिक पाठिंबा मिळून हे सर्व घटक काँग्रेस पक्षासोबत राहिले. या चौकटीला सुहास पळशीकर यांनी 'एकजातीय वर्चस्व आणि बहुजातीय सहमती' असे म्हटलेले आहे. यशवंतराव चव्हाण यांचे 'काँग्रेस वर्चस्वाचे प्रतिमान' व 'मराठा वर्चस्व' यामुळे महाराष्ट्रामध्ये काँग्रेस पक्षाचे वर्चस्व दीर्घकाळ टिकून राहिले.

१९७७ नंतर महाराष्ट्रातील काँग्रेस पक्ष व संघटनेची अधोगती होण्यास सुरुवात झाली. राष्ट्रीय पातळीवरील काँग्रेस पक्षाच्या ऱ्हासाचा परिणाम महाराष्ट्रातील काँग्रेस पक्षाच्या ऱ्हासावर झालेला दिसून येतो. केंद्रीय नेतृत्वाने महाराष्ट्रावर लादलेले मुख्यमंत्री यामुळे महाराष्ट्रातील काँग्रेस पक्षाच्या अंतर्गत नेतृत्वामध्ये संघर्ष व दुफळीवाद निर्माण झाला. काँग्रेस पक्षांतर्गत गटबाजी, सहकारातील विसंगती, शेती क्षेत्राची झालेली अधोगती, महाराष्ट्राच्या अर्थव्यस्थेसमोर निर्माण झालेले विविध प्रश्न तसेच भाषा, धर्म, प्रादेशिकतावाद यातून निर्माण झालेली अस्मितावादी व लोकानुनयाचे राजकारण, भारतीय जनता पक्षाच्या मंदिर, मंडल व मार्केटच्या राजकारणाला मिळालेले यश, सत्ताकेंद्री राजकारण, नागरीकरणातून ग्रामीणपेक्षा शहरी विभागाचे वाढलेले महत्व, इत्यादी विविध कारणांमुळे महाराष्ट्रातील काँग्रेस वर्चस्वाची चौकट हळूहळू मोडकळीस यायला सुरुवात झाली.

**१९९० नंतर काँग्रेस पक्ष व महाराष्ट्रातील राजकारण:**

१९९० नंतर काँग्रेस वर्चस्वाच्या चौकटीचे विविध सामाजिक, आर्थिक, संस्थात्मक व प्रादेशिक आधार मोडकळीस आल्याने काँग्रेस पक्षाचा महाराष्ट्राच्या राजकारणावरील प्रभाव कमी झाला. काँग्रेस पक्षाचा पूर्वापार मतदार असलेला विविध समाजघटकातील मतदार काँग्रेस पक्षापासून दूर गेला. महाराष्ट्रामधील काँग्रेस उघडपणे उदारीकरणाचे समर्थन केल्यामुळे काँग्रेस पक्षाची ध्येय-धोरणे जनहितविरोधी वाटू लागली. उदारीकरणाचे धोरण तत्कालीन सरकारने स्वीकारल्यामुळे शेती क्षेत्र विरुद्ध उद्योग क्षेत्र असाही संघर्ष निर्माण झाला. महाराष्ट्रामध्ये ग्रामीण विरुद्ध शहरी संघर्ष मोठ्या निर्माण झाला. शहरी व ग्रामीण संघर्षामध्ये काँग्रेस नेतृत्वाला समन्वय साधता आला नाही. शहरीकरण व नागरीकरण यामधून शहरी मतदारसंघाची संख्या वाढून ४६ टक्के झाली. याचा परिणाम म्हणून महाराष्ट्राच्या राजकारणावरील शहरी मध्यम वर्गाचा प्रभाव वाढला. उदारीकरणानंतर मोठ्या प्रमाणात वाढलेल्या मध्यमवर्गाच्या अपेक्षा काँग्रेस पक्षाला पूर्ण करता आल्या नाहीत. शिवसेना व भारतीय जनता पक्षाची सुरुवातच शहरी भागातून झाली. त्यामुळे शिवसेना व भारतीय जनता पक्षास शहरी भागामध्ये चांगला पाठिंबा मिळू लागला. महाराष्ट्रातील अर्थव्यवस्थेत खूप मोठ्या प्रमाणात बदल झाले. बेरोजगारी प्रचंड प्रमाणात वाढली. सर्वसामान्य मतदारांच्या अपेक्षा काँग्रेस पक्षाला पूर्ण करता आल्या नाहीत. त्यामुळे काँग्रेस पक्षाची मतदानाची टक्केवारी व जागांची संख्या यामध्ये खूप मोठ्या प्रमाणात घट झाली.

१९९० नंतर सुमारे ३० वर्षांच्या कालखंडात हिंदुत्ववादी राजकीय पक्ष महाराष्ट्राच्या राजकारणात स्थिर झाले. भारतीय जनता पक्ष, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या रूपाने काँग्रेस पक्षाला पर्याय निर्माण होण्यास सुरुवात झाली. राजकीय स्पर्धा ही बहुपक्षीय बनली. मराठा वर्चस्वाला आणि त्यामागील धुरीणत्वाला धक्का पोहोचला. काँग्रेस पक्षामध्ये पक्षनिष्ठा व विचारसरणीचे महत्व कमी झाले. निवडणुकांमध्ये पैशाचा मोठ्या प्रमाणात वापर होऊ लागला. तात्कालिक घटना व स्थानिक मुद्दे राजकारणात महत्त्वाचे ठरू लागले. राजकीय नेतृत्वाकडून लोकमत तयार करण्यासाठी तसेच स्वतःची व स्वतःच्या पक्षाची प्रतिमा निर्माण करण्यासाठी सामाजिक माध्यमांचा वापर मोठ्या प्रमाणात होऊ लागला. तंत्रज्ञानातील प्रगतीचा प्रचारयंत्रणेवरील प्रभाव वाढला. राजकीय नेतृत्वाकडून वैयक्तिक आरोप-प्रत्यारोप व प्रतीमा हनन मोठ्या प्रमाणात होऊ लागल्याचे दिसून येते. प्रत्येक राजकीय पक्षात गटबाजी व फुटीरतावाद वाढलेला दिसून येतो. विरोधी पक्षाच्या नेतृत्वावर पाळत ठेवण्याची यंत्रणा सर्वच पक्षांकडून उभी केली गेली. या सर्व गोष्टींचा परिणाम काँग्रेस पक्षावर होऊन काँग्रेस पक्षाचा ऱ्हास झाला.

१९९० च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाला काठावरचे बहुमत मिळाले. १९९० मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत १४१ जागा आणि ३८.१७% मते मिळाली होती. औपचारिक सत्ता काँग्रेस पक्षाला मिळाली असली तरी तेव्हापासून महाराष्ट्रात काँग्रेस वर्चस्व संपुष्टात येण्यास सुरुवात झाली. शिवसेना आणि भारतीय जनता पक्ष यांच्या रुपाने काँग्रेसला तीव्र स्पर्धा निर्माण झाली. या काळात सुधाकरराव नाईक व शरद पवार यांचे दोन गट काँग्रेस पक्षात कार्यरत असल्याचे दिसून येतात. एकापाठोपाठ एक मुख्यमंत्री बदलण्याचा काँग्रेसश्रेष्ठींचा खेळ, काँग्रेस पक्षामधील कधीही न संपणारी गटबाजी यामुळे काँग्रेस पक्षाची प्रतिमा मोठ्या प्रमाणात ढासळली. मुंबईतील बॉम्बस्फोट, हिंदू-मुस्लीम दंगल, महाराष्ट्रातील वाढती गुन्हेगारी, शिवसेना-भारतीय जनता पक्ष युतीचा आक्रमक प्रचार, भ्रष्टाचाराची अनेक प्रकरणे इत्यादी कारणांमुळे १९९३ मध्ये सुधाकरराव नाईक यांना हटवून शरद पवार यांना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री करण्यात आले. कमी कालावधीत मुख्यमंत्री शरद पवार काँग्रेस पक्षाची प्रतिमा सावरू शकले नाहीत. तसेच १९९० ते १९९५ या काळात महाराष्ट्रात द्विध्रुवीय राजकारणाला छेद देत तिसऱ्या आघाडीचे राजकारण उभे राहण्याचा प्रयत्न झाला.

१९९५ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी काँग्रेस पक्षात गटबाजी व बंडखोरी वाढली. बंडखोरांमुळे अनेक ठिकाणी काँग्रेस पक्षाच्या अधिकृत उमेदवारांचा पराभव झाला. १९९५ च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाला सर्वाधिक ८० जागा, शिवसेनेला ७३ जागा तर भारतीय जनता पक्षाला ६५ जागा मिळाल्या. जनता दल ११ जागा,

शेकाप ६ जागा, माकप ३ जागा, समाजवादी पार्टी ३ जागा, विदर्भ आंदोलन समिती १ जागा, महाराष्ट्र विकास कॉंग्रेस १ जागा मिळाल्या. शिवसेना भारतीय जनता युतीचे सरकार सत्तेवर आले. १९९५-९९ या काळात शिवसेना-भारतीय जनता पक्ष युतीने कॉंग्रेस पक्षाचे आधार पोखरून काढले.

**राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची स्थापना व कॉंग्रेसचे राजकारण:**

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या स्थापनेने कॉंग्रेस पक्षाला धक्का बसला. पश्चिम महाराष्ट्र पूर्वीपासून कॉंग्रेस पक्षाचा बालेकिल्ला मानला जात होता. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या स्थापनेमुळे या बालेकिल्ल्यातील कॉंग्रेस पक्षाची ताकद दोन गटात विभागली गेली. एक गट राष्ट्रवादी कॉंग्रेसबरोबर तर दुसरा गट कॉंग्रेस पक्षाबरोबर गेला. कॉंग्रेस पक्षाचे महाराष्ट्रातील जिल्हा परिषद, पंचायत समिती, महानगरपालिका, नगरपरिषद या संस्थांमधील बरेचसे शरद पवार समर्थक सभासद राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये गेले. उत्तर महाराष्ट्रातही कॉंग्रेस पक्षामधील एक गट राष्ट्रवादी कॉंग्रेसबरोबर गेला. मराठवाड्यातील औरंगाबाद, उस्मानाबाद, जालना, परभणी व बीड इत्यादी जिल्ह्यातील कॉंग्रेसचे कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात गेले. विदर्भातील नागपूर, अमरावती, चंद्रपूर, अकोला, वर्धा, बुलढाणा, यवतमाळ, भंडारा, गोंदिया, वाशिम, गडचिरोली या जिल्ह्यातील काही नेते सोडले तर सामान्य कार्यकर्ते मात्र कॉंग्रेस पक्षामध्येच राहिले. कोकणातील कॉंग्रेसमधील शरद पवार समर्थक नेत्यांचा एक गट राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये गेला. सहकारी क्षेत्राची देखील विभागणी दोन गटामध्ये झाली. कॉंग्रेस पक्षाचे वर्चस्व असणाऱ्या महाराष्ट्रातील सहकार क्षेत्रातील महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना महासंघ व महाराष्ट्र राज्य बँक या दोन अग्रगण्य संस्था राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या ताब्यात गेल्या. मुंबईमधील राष्ट्रीय मिल मजदूर संघानेही कॉंग्रेस पक्षाऐवजी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाला पाठिंबा दिला. विविध प्रकारच्या अस्मिता हे राजकीय पक्ष व संघटनांचे मुख्य साधन होऊन राजकारणाचाही तो एक आधार बनला.

**निष्कर्ष:** यशवंतराव चव्हाण यांच्या योगदानामुळे महाराष्ट्रातील शेती, सहकार, शिक्षण व उद्योग या क्षेत्राचा मोठ्या प्रमाणात विकास झाला. यामुळे अल्पावधीतच महाराष्ट्र हे भारतातील एक पुढारलेले राज्य म्हणून पुढे आले. यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वामुळे कॉंग्रेस पक्षाला समाजातील विविध घटकांचा पाठिंबा मिळविता आला व कॉंग्रेस दीर्घकाळ सत्तेवर राहिला. १९७७ नंतर केंद्रीय पक्ष नेतृत्वाने महाराष्ट्राच्या राजकारणात प्रचंड मोठ्या प्रमाणात हस्तक्षेप केल्यामुळे महाराष्ट्रातील राजकारण हळूहळू बदलले. १९९० नंतर खाजगीकरण, जागतिकीकरण व उदारकरणामुळे महाराष्ट्राच्या अर्थ-राजकीय प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात बदल झाले. महाराष्ट्राच्या विकासापुढे अनेक समस्या निर्माण झाल्या. जातीय व धार्मिक अस्मितावादी राजकारण करणारे पक्ष यशस्वी होत गेले. १९९९ मध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची स्थापना झाल्यामुळे कॉंग्रेस पक्षाची राजकीय ताकद खूप मोठ्या प्रमाणात कमी झाली.

**संदर्भसूची:**


१. **बापट राम, 'भारतीय राजकारण : मर्म आणि वर्म'**, चौसाळकर अशोक (संपादक), लोकवाङ्मय गृह, मुंबई, २०११.

२. **बिरमल नितीन, 'प्रबळ जातीचा प्रादेशिक पक्ष : राष्ट्रवादी कॉंग्रेस'**, समाजप्रबोधन पत्रिका, पुणे, ऑक्टोबर-डिसेंबर १९९९.

३. **भावे मधुकर, 'यशवंतराव ते विलासराव'**, मनोविकास प्रकाशन, पुणे, २००८.

४. **भोळे भास्कर, 'समाजविमर्श'**, लोकावाडमय गृह प्रकाशन, मुंबई, डिसेंबर २०१०.

५. **चपळगावकर नरेंद्र, 'राज्यघटनेचे अर्धशतक'**, मौज प्रकाशन, मुंबई, २००२.

६. **चव्हाण यशवंतराव, 'सह्याद्रीचे वारे'**, माहिती व जनसंपर्क संचलनालय, महाराष्ट्र राज्य,मुंबई.

७. **चौसाळकर अशोक, 'महाराष्ट्राच्या राजकारणातील बदलते प्रवाह',** गर्जना, दिवाळी अंक, कोल्हापूर १९८३.

८. **चौसाळकर अशोक, 'संसदीय लोकशाहीचा पेचप्रसंग'**, समाजप्रबोधन पत्रिका, जानेवारी-मार्च २०१५.

९. **चौसाळकर अशोक, 'महाराष्ट्र कॉंग्रेसचे ऱ्हासपर्व'**, '**महाराष्ट्राचे राजकारण : नवे संदर्भ'** (संपादक : चोरमारे विजय), नवता प्रकाशन, मुंबई, मार्च २०१४.

१०. **चौसाळकर अशोक** (२०१०) '**महाराष्ट्राचे राजकारण'**, नवभारत, पृ.क्र. ४-२०.

११. **चोरमारे विजय, 'महाराष्ट्राचे राजकारण : नवे संदर्भ'**, नवता प्रकाशन, मुंबई, मार्च २०१४.

१२. **द्वादशीवार सुरेश, सेंटर पेज**, साधना प्रकाशन, पुणे, ऑक्टोबर २०१४.

१३. **गोडबोले माधव, 'भारताच्या संसदीय लोकशाहीची अग्निपरीक्षा',** राजहंस प्रकाशन, पुणे, २०१२.

१४. **घोटाळे विवेक, (२००५) 'महाराष्ट्रातील आघाड्यांचे राजकारण',** (एम. फिल. अप्रकाशित शोधनिबंध), सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

१५. **जोशी श्रीपाद भालचंद्र, 'वेगळा विदर्भ की अखंड महाराष्ट्र? एक वादाची सद्यस्थिती'**, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, २०१३.

१६. **जैन अशोक, 'राजधानीतून'**, राजहंस प्रकाशन, पुणे, २०१०.

१७. **मोरे सदानंद, 'गर्जा महाराष्ट्र',** सकाळ पेपर्स, प्रा. लि., नोव्हेंबर २०१३, पुणे.

१८. **पळशीकर सुहास, कुलकर्णी सुहास, 'सत्तासंघर्ष'**, समकालीन प्रकाशन, पुणे २०१०.

१९. **पळशीकर सुहास, 'जात व महाराष्ट्रातील सत्ताकारण'**, सुगावा प्रकाशन, पुणे २००३.

२०. **पळशीकर सुहास, 'देश-प्रदेश : प्रादेशिक राजकारणाच्या बदलत्या दिशा'**, द युनिक अकेडमी प्रकाशन, पुणे, २०१५.

२१. **पळशीकर सुहास, महाराष्ट्राचे बदलते राजकारण : काँग्रेस वर्चस्वाची जडणघडण आणि पडझड, 'बदलता महाराष्ट्र : साठोत्तर परिवर्तनाचा मागोवा'** ( संपादक : भा. ल. भोळे, किशोर बेडकिहाळ),आंबेडकर अकादमी, २००३, सातारा.

२२. **पळशीकर सुहास (संपा.) 'भारतातील प्रादेशिक पक्षांचे राजकारण',** साधना प्रकाशन, पुणे २००९.